# चंद्रबनातल्या सावल्या

**चंद्रकुमार नलगे**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B123

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर

**चंद्रबनातल्या सावल्या : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १७०/-

---

महाराष्ट्र साहित्य, कला, संस्कृती आणि लोकजीवन या संदर्भात

नव्या परिवर्तनाचे नवे पर्व परिवर्तित करणारे

---

**भारताचे कृषी मंत्री नामदार शरदरावजी पवार**

यांच्या द्रष्टया विचारधारेस

---

## कथाक्रम


१. मस्करीचे दिवस / ५
२. झपाटलेलं रान ! / १३
३. गावाकडच्या जत्रा / २३
४. हवेतले झोके / ३७
५. एक शापित स्वप्न / ४६
६. चंद्रबनातल्या सावल्या / ५६
७. आणखी एक जटायू / ६७
८. डोळे वादळाचे ! / ७८
९. वळण / ९१
१०. लाल डोळ्याचा माणूस / १०५
११. रातवा / १२२
१२. गणेश गवंड : एक जरतारी पैठण / १३३
१३. अक्षराचं बेट ! / १४२
१४. भुलावा / १४८
१५. एक होती परी / १५७
१६. देवाचिये द्वारी / १६७


## मस्करीचे दिवस

पाऊस तसा बाजिंदाच दांडगा. आभाळासंगं उगीचच झटयाझोंब्या खातो खातो आणि एकाएकीच थांबतो. चुकापाडीनं माग धरतो. कधी ढगाच्या सावलीला लोंबकळून खाली उतरतो; तर कधी उन्हाच्या जरतारी किरणांच्या खांद्यावरून उडी घेतो. ओढ्यावगळांनी ओसंडून वाहतो. दसऱ्याच्या सोन्याची भिंगं राजवस्त्रांवर लगडून घेतो. खंडेनवमीला आपलीच भिजून चिंब झालेली वस्त्रं शमीच्या झाडावर वाळवत बसतो. रानामाळात गच्च फुललेल्या काराळच्याच्या पिवळ्या फुलांच्या मुंडावळ्या कुणा धटिंगणाच्या गुडघ्याला बांधतो. दिवाळीतल्या आकाशदिव्याची झिरमिर चेंडूसारखी उडवतो. निळाईजवळ तरंगणाऱ्या पतंगाच्या शेपटीला धरतो. सर्कशीतल्यासारखे उलटे झोके घेतो. मग ढगांच्याच पायघड्यांवरून दिगंतापार होतो.

रानचे गुराखी बिनदिक्कत होतात. मोळुशीच्या पिवळ्याफोक पोसूच्या नागफड्या करतात, 'दिन दिन दिवाळी' म्हणत गाई-म्हशींना ओवाळतात.

'आमच्या नागोबाला शेर शेऽर तूप वाढा' म्हणतात. दारोदार नागफणा मिरवतात. शेंबडीमेकडी पोरंसुद्धा 'शेल शेल' तुपासाठी बोबडी हुज्जत घालीत राहतात.

त्यांचं अपरूप वाटतं. लोण्याचा गोळा ठावक्यात घातला जातो. ठावक्यातली वात ढणाणा जळायला लागते.

'दिन दिन दिवाळी'च्या नागफण्यांचे सात-आठ दिवस मोठ्या तंद्रीचे. गुराखी पोरांची मनं पोसू शोधण्यात नि नागफण्या करण्यातच रमून गेलेली असतात. एरवी नजरेच्या रिंगणात फिरणारी गुमान गुरं, पण याच दिवसांत बेगुमान होतात. त्यांनाही मस्करी करण्याची लहर येते. खुळ्या पोरांच्या बावळ्या नजरा चुकविल्या जातात. डोंगराच्या कुसाडी कुसाडीनं कुठल्या कुठे पसार होतात. त्यांच्या पायांनाच जणू वाटा फुटतात.

-शिंगं फुटायच्या आधीच.

गुराख्यांच्या तोंडात राळं वाळतात. त्यांच्या पायाखाली धरती ठाव देत नाही की, वरचं आभाळ डोईवर उरत नाही. कुणाची गुरं आकुळर्चाच्या देवळावर बांधलेली असतात, तर कुणाची वाकडशिंगी म्हैस नेर्ल्याच्या कोंडवाड्यात डांबून ठेवलेली असते. कुणाचे टिक्के रेडे दोन दोन शिवा पार करून कुठल्याशा छपराची आढी शिंगात अडकून हुंदाडत असतात, तर कुणाची गायरं शेपट्या वर करून चौखूर उधळत असतात. वासरांच्या कानात तर वाराच शिरलेला असतो.

गुराख्यांचा जीव रडकुंडीला येतो. गुरांच्या शेपटांचं करकांडं पाडावंसं वाटतं. डोळं फिरवून टाकणाऱ्या खोल खोल दऱ्या जीव हल्लक करून टाकतात. गावोगावच्या खडप्यांना चढता-उतरता पाय ठेचाळतात. टेकाडं पालथी घालताना सारा जन्म आठवतो.

फिरफिर फिरावं, पायपीट करावी, चौमुलूख तुडवावा अन् हताश होऊन घरी परतावं, तर डोळ्यांवर विश्वासच बसत नाही. चुकलेली जनावरं आपल्याच वळचणीला उभी. गाळानं लदबडलेली. निवांत रवंथ करीत. काहीच घडलं नाही अशा थाटात. शांत. अगदी शांत. निर्विकार.

पापणीसुद्धा इकडची तिकडं नाही. तसं त्यांचं उभं राहणं आपल्यालाच मूर्खात काढीत असतं...

'कुठं उंडारत होता इतके दिवस?'

मग फडाफडा स्वत:च्याच मुस्काटात मारून घ्याव्याशा वाटतात.

अशी फसगत. अशी मस्करी. चुकार जनावरांनी अशा गावात गाढवाचा गोंधळ घातला की, गावालाही काहीतरी सनसनाटी घडल्यासारखं वाटतं. नाही तरी अळणी



गावात मिळमिळीतच सारं. पण गुरांच्या या मस्करीनं लुकडा गावही कुकुची कूऽ करू लागतो. चार गावांची कुंपणं मोडून, खंडीभर चिखलानं लदबडून आल्यावर गुरानांही कसं नवं नवं, न्यारं न्यारं जगल्यासारखं वाटतं.

जत्रांच्या दिवसांत जशी एक नशा, लग्नाच्या दिवसांची जशी एक नजरबंद धुंदी, तशीच या चुकारीच्या दिवसांची एक मजाच असते. चुकार गुरांची, दमछाक पोरांची. त्यांच्या जाळीआडच्या तांबजाई देवीची.

तांबजाई... गुरांची राखणकर्ती. तिच्या भरवशावर झाडावरच्या उपल्यांना खुशाल 'हुपऽ हुप तुझ्या शेंडीला तूप' म्हणून वेंगाडावं.

नागझरीच्या कातळावर ओलेता दंगा करावा, दूरच्या येड्याबागड्या कुणासाठी ओळखीची शीळ घुमवावी. मग तांबजाईच्या धमाल जत्रंसाठी मुडग्याचा खेळ मांडावा. मापटं मापटं तांदूळ, कोळवं कोळवं चटणी, पसा पसाभर मीठ, खमंग मासळी. जमलं तर नजरंत खुपणारा तुरंवाला कोंबडा. रणरणत्या उन्हातच रस्सा उकळत असतो. जत्रंतला वाघ कुणी व्हायचं यावर उकळत्या रस्स्याच्या साक्षीनं तणातणी होते.

तसल्या उन्हात देवीसारख्या देवीला- तांबजाईला कापरं भरतं. बारकुल्या पोरांची काळजं धडधडू लागतात. दोन थोराड तुरंवाल्या पोरांच्या नावानं तांबजाईला भातकुंडं चिकटली जतात. डावा-उजवा कौल होतो. तुरंवालं पोराच्या उघड्या अंगावर गुलालाचे पट्टे ओढले जातात. गळ्यात पानाफुलांच्या माळा घातल्या जातात. खोबऱ्याची वाटी तोंडात दिली जाते. मग रानामाळातनं हा वाघ धावत सुटतो. मागनं उघडी बोडकी पाच पन्नास पोरं त्याला पकडायला पळतात. नशीब वाघाचं. सापडला तर त्याचा खेमाच. हाडं धड राहिली तर शपथ. जीवाच्या करारानं तो नदीच्या रोखानं धावतो.

असा थरारक खेळ शिवारभर चालतो. 'वाघ आलाऽऽ वाघ आला' असा दंगा शेताभातात उठतो. दिसेल त्या पिकाची नासधूस करीतच हा वाघ नि पाचपन्नास पोरांचं लोंबाळ पळत असतं. पण एक कौतुकाचा भाग म्हणूनच सारं गुपचूप सहन केलं जातं. नाहीतर काठ्या-कुऱ्हाडी बांधाबांधावर उगवल्या असत्या. पण उभा गाव मोठ्या हुरूपानं पोरांना हुशारी देत असतो, 'वाघ आलाऽऽ वाघ आला' या दंग्यानं आभाळकडा घुमत असतात.

वाघ पाण्यात पडला की खेळ संपतो. वाघाचा जीव भांड्यात पडतो. मग

इतक्या पोरांचा एकच उच्छाद पाण्यात मांडला जातो. मनसोक्त डुंबून जीव कोंडला की, माळावरच्या घमघमीत रस्स्याची आठवण होते.

तांबजाईचा निवळसंख रस्सा वरपून झाला की, शेंगांचे दिवस सुरू होतात. या दिवसांची चंगळ तर औरच. ज्याचा पहिल्यांदाच भुईमूग काढायला येतो, त्याच्या शेतात शेंगा होण्याऐवजी त्याच्या काळजाचं पाणी पाणी होतं.

'उद्या भुईमूग काढू. पाचसा बायका वेचायला असल्या की पुरं. नाहीतर घरच्या घरीच काढू.' असं शेतकऱ्यांचं घरातल्या आतल्या गोटात खलबत चालतं. या कानाचं त्या कानाला कळायला नको. पण आतले सारे कट नि कोट फोडून ही बातमी वाऱ्यावरची वरात ठरते. शेताचा धनी वावराच्या वाटेला लागायच्या आधीच जाळी जाळीला माणूस डसलेलं असतं. चहू वाटांनी पोरीबाळींचा लोंढाच लोंढा लागतो. शेताचा धनी उपऱ्यासारखा ठरतो.

मग त्याला वाटतं, धरणी पोटात घेते तर बरं... आपल्याला किंवा शेंगांना. नाही तर त्या लोंबाळाला.

पण माणसंच शेंगांना पोटात ढकलतात आणि धरणी कूस बदलून निवांत झालेली असते. नशीब पाठ फिरवून ढेकळं उलथीत असतं. भरायच्या आधीच खळं उलगून जातं. मग बायकांनाच लाजल्यासारखं वाटतं. शेंगांनी भरलेली पाटी डोक्यावर घेऊन कर्णासारख्या उदार होतात. पसाभर शेंगा धन्याच्याच पदरात टाकतात. डोईवरची पाटी तोलीत म्हणतात कशा, 'तलफंला होतील. सांच्याला तेवढ्याच व्हरपळून खावा.' शेतकरी पुढं पडलेल्या शेंगा चिवडीत उलगलेल्या वावराकडं बघतो. वावरात राहिलेली एखादी शेंग कावळे शोधत असतात.

गावच्या बलुत्यांच्या पदरात काय टाकायचं याचा विचार त्याला गोफण मिठी घालून बसतो. तलफ... कुणाला कसली... कुणाला कसली. पण आम्हाला मात्र शेंगांची भलतीच ! स्वप्नांचंही तसंच. कुणाला कसली, कुणाला कसली. तरण्याताठ्यांना बाशिंगाची... म्हाताऱ्या-कोताऱ्यांना झगमगीत पालखीची, रेड्यावरच्या यमाची... पोरीबाळींना अबलक वारूवरच्या राजकुमाराची... कुणाला धनाची... कुणाला कुणाची... इकडच्याला तिकडची... तिकडच्याला इकडची... चिल्लर खुर्द्याची तर ना गणतीच. आम्हाला आपलं पडणारं स्वप्नं-सोनेरी नगरीचं-शेंगांचं.

एरवी भरदुपारी छपराच्या आढ्यावर सूर्य येतो. तिरपीला बसावं तसा कौलावर



बसतो. भुतासारखं आपलं हात ह्या इतकं लांब करतो. सान्यातून आमच्या कानशिलापर्यंत आले तरी सकाळच्याच साखरझोपेत असणारे आम्ही. पण जाळ्यांना आरा फुटल्यापासून आमची झोपच उडालेली असते. लुसलुशीत कोवळ्या पांढऱ्या फेक गाजरांची शेंग वयात आली की आमच्या स्वप्नांची राणी तीच... तीच टच्च, टंच शेंग.

मग 'आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चोहीकडे.' हिरव्या रानी हिरवी गाणी सुरू होतात. रात्री अपरात्री शिळा घुमू लागतात. शिलेदार खलबत खान्यात जमतात. स्वाऱ्यांच्या आखण्या होतात. रोहिडेश्वराच्या साक्षीनं शपथा घेतल्या जातात. आधी लगीन कोंडाण्याचं ठरतं.

कुणी शिर उडालं तरी धडानिशी लढणारा मुरारबाजी होतं, तर कोण पाच तोफांचे आवाज कानी पडेपर्यंत खिंड लढवणारा बाजीप्रभू बनतं. ठाणेदाराला गाफील ठेवण्याची कामगिरी कुणी शिरावर घेतं, तर गोंधळ घालून बित्तंबातमी काढणाऱ्या बहिर्जीचं सोंग कुणी घेतं. सीमोल्लंघनाचा मुहूर्त ठरतो.

गझनीच्या महंमदानं केलेल्या सतरा स्वाऱ्या फालतू वाटतात. तसं सांगणारे गुरुजी खोटं खोटं सांगून शाळाच करतात असं वाटायचं. एक घाव दोन तुकडे हा आमचा बाणा ठरतो. कल्याणचा खजिना आता दूर नसतो.

पण हल्ल्याच्या वाटा शोधण्यातच शंभर वेळा हेलपाटे होतात. गुप्त धन पारखण्यासाठी तीन-चार वेळा शाळा बुडविलेल्या असतात. कुंपणाचे चक्रव्यूह भेदण्यासाठी अटकळ बांधण्यात पाच-सहा अंधाऱ्या रात्री पायात रुतून बसलेल्या असतात. शत्रूच्या हालचालीची टेहळणी करण्याकरिता दोन-तीन रविवार खुंटीवरच्या दप्तरात अडकून ठेवलेले असतात. सवंगड्यांना पुस्तकांच्या आडून कानमंत्र देताना वहीम येऊन गुरुजींनी दोन-तीनदा तरी आमच्या कानाचे गड्डे उपटलेले असतात. पण गुरुजींनीच शिवरायांनी शिंगांना पलिते बांधलेल्या बैलांच्या कात्रजघाटाचा शिकवलेला ताजा धडा डोक्यात रिवरिवत असतो.

मोर्चेबांधणी होते. पण आमचा सगळाच होरा चुकतो. दगा होतो. आमच्यावरच चहूबाजूंनी वेढा पडतो. आम्ही टाळलेला सूर्याजी पिसाळ वेगळी चाल खेळलेला असतो. खोटा ठरवलेला इतिहास खरा ठरतो.

कानशिलावर उठलेल्या बोटावर निभावत नाही. जेरबंद करून घरच्या तोफेच्या तोंडी दिलं जातं. अवघ्या बुरुजावरील सुरुंग पेटलेले असतात.

आमचा दिल फारच जखमी होतो.

दत्ताजी शिंद्याच्या रूपा मुलाणी गुरुजीच स्वप्नात येतात. सांगतात कसे, 'बचेंगे तो और भी लडेंगे !'

मित्रांच्या सुजलेल्या कानशिलावर बोटं फिरवत तार छेडली,

'सूर्याजी पिसाळाच्या शेतावरचेच तंबू कापायचे !'

शेंगा काढणीचे ऐन दिवस. सारीच त्रेधा. ज्याच्या त्याच्या शेतात कुळव सुरू होतात. कुणीच कुणाचं नसतं, आपलीच माणसं आपल्याच शेतावर असतीलच याची खात्री नसते. दिवस फितुरीचे असतात. दिल्या-घेतलेली माणसंही दगलबाज ठरतात. पैराऐरा तर चालत नसतो. तळव्याखालची सावलीही दिसत नसते. आपलंच रान आपल्यालाच खंदत बसावं लागतं.

तरीही शेंगाचे दिवस म्हणजे हुरूपाचे. रंगती-संगतीचे उत्साही क्षण. अपूर्व स्नेह सोहळा. कुरूक्षेत्रच.

त्या पुण्यक्षेत्रावर भक्तासाठी विश्वदेवाने विश्वदर्शन घडवलं. अवघं ब्रह्मांड एवढ्याशा मुखात... वीरासारखा वीर अर्जुन दिपून गेला. भोवंडला. तसं इथंही स्नेहब्रह्म अवतरलेलं असतं. विश्वातला सर्व समभाव तिथं नांदू आलेला असतो.

हारीनं शेंगा चाळायला बसलेल्या बायका. उत्साहाचा मोतियाच. झगमगती झुंबरंच हसू यावीत तसं सगळं वावर असतं. विश्वकर्म्याचं मातीत लपलेलं हसू वेचण्यासाठीच जणू सर्व बायका आतुर झालेल्या. ठसठशीत, आखीव-रेखीव बांध्याच्या, धारदार नाकाच्या, रूळणाऱ्या बटांच्या, माती माखल्या गंधित नजरांच्या... उमळू आलेल्या गंधकळ्या...

कुणी गाणी म्हणत असतात. मोती-पोवळ्याचा महाल कोणी बहाल करीत असतं. कुणा चुकल्या वाटसरूची, कुण्या राजाची कहाणी कोण सांगत असतं. मांडत असतं. कोणी धरतीची माया उखाण्यात मांडत असतं. कुणी हेंच्या, कुणी त्यांच्या कौतुकगोष्टी गालाला चढलेल्या लालीतनं व्यक्त करीत असतं. थट्टामस्करीत पात संपत असते. घरातली द्वाड सासू शेंगाबरोबर चाळली जाते. कुठं तरी चोरटी कुजबूज चाललेली असते. कुणा थोरामोठ्यांच्या सुनंचं गबाळपण पातापातात बोललं जातं. कुणाच्या हातावरचं ताजं गोंदणं मुरमुरत असतं तर कुणाच्या गळ्यात झुलणारं कोरं करकरीत मंगळसूत्र गोड गुदगुल्या करीत असतं.

कुणाचं चिमणं लेकरू उन्हातल्या फडक्याखाली बाळमुठींचा डाव मांडत असतं, तर कुणाचा गोजिरवाणा ढेकळातली माय शोधत असतो. अरगडी पोरं न भरणारे फाटके गळके खिसे शेंगांनी भरण्याचा आटापिटा करीत असतात. शेंबड्या पोराचं मातकटलेलं ध्यान बघण्यासारखं झालेलं असतं.



लाल मातीचा गुलाली रंग पदरात साठवायला आभाळसावली अंतराळातून हिरव्या रानात ओलकंबत असते. शेतकऱ्याच्या तळहातावरच्या भाकरीवरल्या मिरचीच्या ठेच्याला अधिकच रूची चढत असते. लसणीच्या वासानं सूर्यनारायणाच्या तोंडाला पाणी सुटतं. कुणाच्या भाकरीवरचा लोण्याचा गोळा वितळून टाकतो. बुटीखालच्या डांगारभाकरीवर खूश होतो. जाळीखालच्या भाकरीवरच्या हिरव्याकंच मिरच्या कराकरा चावतो. हापापल्यासारखा. मिरचीनं तोंड फणफणलं की ढगाच्या आडाला जाऊन अपाली फटफजिती झाकून ठेवतो.

शेतकऱ्याचं डौलदार चालीनं औत चाललेलं असतं. बैलांच्या गळ्यातल्या वाजणाऱ्या घुंगरांनी वातावरणात जोम चढतो. शेतकऱ्याच्या ओठावरचं गीत जमिनीतून उफाडून येत असतं. नांगराच्या तासातून देवश्रेष्ठाचा शेष मातीतून वेरोळत वर येतो. पंचफड्या काढतो, जमिनीवर आपटतो, भूदेवाला अभिवादन करतो. सळसळ करीत कुठल्या कुठं दिसेनासा होतो.

बघता बघता आकाशातील ढगाच्या पुंजातून कुणी गंधर्व उतरावेत तसे पांढरे शुभ्र बगळे शेतात उतरतात. जणू पांढरे शुभ्र कोंबच ओल्या मातीतून तरारून आलेत. प्रभू रामाची सेनाही झाडामागे झाडे टाकीत इथे येऊन दाखल होते. बांधावरल्या आंब्यावरच्या खारोटीने दिलेल्या निमंत्रणाप्रमाणे रानावनातली पाखरं केव्हाच आंबेदाखल झालेली असतात. लाल झुलपेदार सरड्याची धावाधाव कुंपणापर्यंत चालू असते. गवतातले विमानपंखी घोडे उगीच इकडून तिकडे तरंगत असतात. जाळीकडाची उंदराची कोवळी लुसलुशीत पिले कोटच्यातल्या पाखराच्या इवल्याशा पिलांचे डोळे उघडले की नाही ते लुकूलुकू डोळ्यांनी पाहात राहतात. कावळ्याच्या चाललेल्या खोड्या सागावरचा कवडा कुरणातल्या तित्तर पक्ष्याला सांगत असतो. कुत्र्याने झापातली फोडलेली गार पाण्याची घागर पाहून जाळीतल्या सशाचं काळीज हालायला लागतं. उंदराच्या कोठ्या पाहून वारूळातल्या मुंग्या बावरून जातात. आपणच तडीपार होतात. आभाळाचं दान ठेवायला सुतारपक्षी बाभळीच्या झाडावर कोठी कोरीत असतो.

वाटेचे वाटसरू वाकडी वाट करतात. डोंगरचे गुराखी माळ उतरत असतात.

चुकार पोरं कुंपणाआड उभी असतात. शाळाबुडवी मुलं एक पाय खळ्यात; एक पाय मळ्यात ठेवून उभी असतात. भिकार पोरं नजर चुकवीत तसूतसूनं पुढं सरकत असतात. करपाडीतलं खोकाड आणि जाळीत लपलेला खवल्या मांजर या साऱ्यांच्या हावरटपणाबद्दल हसत असतात. दोघांच्यामागे भिकाऱ्यांची दांडकी उभी असतात. पण भूमिपुत्र डळमळत नाही, डगमगत नाही. त्यांच्या नजरेत असतो, चिवारीतला कक्कुडकोंबडा. शुभशकुनी भार्गवराम ! दिवसाचा गोंडा फुटताना दिसलेला.

❖ ❖ ❖



# झपाटलेलं रान !

बादं- बाजारवाटंच्या नि शिवंच्या वढ्याच्या बेचक्यातलं आगराळ झाडाझुडांचं. जवळनं जाताना जीव दडपतो. दिवसाढवळ्याबी मी मी म्हणाणाऱ्यांचं काळीज फुटतं. पटका काखंत मारतो. धोतराचा सोगा चांगला खच्चून खवतो. मनात राम राम घोकत पळत सुटतो. धोतर फिटतं. कुंपणात बत्तरबाळ्या होतात. पण ह्यांचं पळणं अगदी दमछ्याक. रणरणत्या उन्हात बाद्याकडं नुसतं बघितलं, तर भयाणभूक दिसतं. झडप घालण्यासाठी पवित्र्यात टपलेल्या मांजराकडं उंदरानं बघावं तसं वाटतं. कडुसं पडलं, हरमाळ टळली की, सगळ्या बाद्याचा बागुलबुवाच झाल्यासारखा.

एवढा मोठा भैरू दरा. तीन ताड. आभाळानं बी मस्तक टेकल्यालं. त्याची कुसाड फोडून सुटलेला शिवंचा वढा. वाघा-चित्त्यांची झेप कसली. भल्या भल्या दरडींचा पाणलोट करीत रोऱ्यांवत धावणारा. मांडी मांडीएवढ्या सापांच्या विषारी वारूळांच्या बाहुल्या नाचवीत धावणारा वढा. बाद्याजवळ आला, की उरमोडी होते. गचकन् थांबतो. चोरपावलं टाकत बाजूबाजूनं निघतो. श्वास रोखीत. बाद्याची हद्द संपली की, वाऱ्यासारखा सुटतो. पापणी लवायच्या आत नदीत जाऊन पडतो. एवढा धसका. एवढा थरकाप.

इथला वारा म्हणजे झपाटल्यासारखा. भुताचा बापच. झोटिंग नुसता. झाडांची नुसती भिंगरीच. तिकडं केवळ बघितलं, तरी नजरेच्या चिंध्या व्हाव्यात. एवढा झपाटा. तो थांबला की, झाडं चिपाड झाल्यागत नेभळून जायची. चापलून टाकल्यासारखी वाटायची. विजांचे चपकारे मुठीत धरून भिरकावणारा हुंबूर किती पिढ्यांची ताकद एकवटून, पाय रोवून उभा असणारा हुंबूर, पण तोसुद्धा अंग लटकं पडल्यासारखा वाटायचा. पिळून काढल्यासारखा. असा वारा पिशाच्यासारखा.

बाद्याची रात्र तर किरकिर किरव्याची. रातकिडयांच्या भयाण सुरावटीची... काळीजफोडया घुबडांच्या घुत्काराची... आतडी कुरतडणाऱ्या. कोल्हेकुईची... करकरणाऱ्या कळकी बेटांची... सळसळीची... घसघसीची... गंभीर... दातखिळीची... मध्यान्हीच्या पाठीवर आपलीच विषगुळणी चाटीत चढणाऱ्या केसाळ सर्पांची.

इथल्या हिरीचा काटा सगळ्या गावाच्या उरात रूतणारा. सापांच्या तिडणीच्या तिडणी अंगभर ल्यालेली. खिळ्याखिळ्यातून वाव वाव लांबीच्या काती सुटलेल्या ही हीर म्हणजे पाण्यात पाय सोडून बसलेली, विस्कटलेल्या झिंज्यांची ल्हावसटच. पुराणातल्या बकासुरासारखी. गावातला एखादा तरी जीव वर्षाकाठी इथं जायचा. अवसंपुनवंला हिच्या काठावर लिंबू, गुलाल पडायचे. तीन खणी, पाच खणी परड्या हिच्या पाण्यात तरंगत असायच्या. नारळाच्या कवच्या नि कोंबडयांची पखं जाळ्याजाळवंडात दिसायची. विझलेल्या अर्ध्यामुर्ध्या उदकाड्या भुताटकीसारख्या वाटायच्या. ह्या हिरीच्या काळ्या पाण्यातच आत आत भुयार आहे नि तिथून बाद्यातल्या भुताचा येण्या-जाण्याचा मार्ग आहे अशी वंदता पांढरभर पसरलेली. ते भूत रात्रीचं बाहेर पडतं. कधी सुंदर बाई बनतं. वाटसरूला भुलवतं- बाद्यात नेतं. आपणच एकाएकी नाहीसं होतं. कुत्रं बनतं... कधी अस्वल बनतं आणि वाटसरू तरकून जातो. बांद्याच्या आसपास इंद्राची खरीखुरी अप्सरा दिसली, तरी पुरुषासारख्या पुरुषाची त त फे फे होते. सरग आठवतो. फेंगड्या पायाची, तिरळ्या डोळ्यांची, कपाळभर कुंकू ल्यालेली, फासळ्या दाताची बाई दिसली तर मग काय दातखिळीच. ती माऊली आपल्या वाटेने आपली चाललेली असते. ह्याला हिंव भरतं... तीन बोटं ताप चढतो. मांत्रिक छडी आपटीत दरडावतो, 'बोल, कुठलं हाईस. बोल, झाडाला सोड,' पण ती बाई झाडासंगंच घुमत असते.

बाद्यात सावरीच्या झाडांचा पुरकाळाच. बांधावर, गवताच्या सड्यात आपली



उभीच उपऱ्यासारखी. चांदाचा मुका घ्यायला निघालेली. पण अंगभर काट्यांचा टरटरीत सराटा. त्यांच्या शेंड्याकडं नजर उचलून बघायचं झालं तर, मानंचा काटा ढिला व्हायचा. अवघडून मान उताणी करून बघावं लागायचं, तेव्हा नजर लपलपत पोचायची. त्या झाडाकडं बघायचं झालं तरी अंगावर काटा सरसरून यायचा. त्याचं काटं डोळ्यांत टरटरून शिरतायंत असं वाटावं. बाद्यातल्या सावरी फुलल्या तर सगळं रान तांबड्या रंगानं पेटून निघायचं. पानं झडायची, तांबड्या फुलांचा सडा पडायचा. मग सगळं बादं तांबड्या भुताटकीनं भयानक दिसायचं. सड्या सावरीच्या उघड्याबोडक्या फांद्याफांद्यांवर हिरवी फळं लहडायची. चांगली पोपटी. केळाच्या आकाराची. बोडक्या सावरीवर पोपटांचं थवं बसल्यासारखं वाटायचं अन् तेही भेसूर वाटायचं. सावरीची तांबडी फुलं हुंगली की डोळं जातात असं कुणी कुणाला सांगे. मग जीव अधिकच दडपून जाई. त्याहीपेक्षा कुठूनतरी गिधाडांचं थवंच्या थवं आभाळातनं एकाएकी उतरायचं. पंख फडफडवीत सावरभर बसायचे. सावरी कुरूप वाटायच्या. झडपा मारीत त्यांच्या फळ्याच्या फळ्या उठायच्या. माळावर पडलेल्या जनावरांचं लचकं तोडायला तुटून पडायच्या. हे सारंच विचित्र वाटायचं. रानभरच्या सावरीबद्दल भय वाटायचं.

चैताच्या रणरणत्या झळांत बोडक्या सावरी कशाश्याच वाटायच्या. त्यांच्यावरची बोंडं सुकायची, फुटायची, तडकायची. त्यातून पांढराशुभ्र कापूस बाहेर पडायचा. वातावरण त्या पांढऱ्या कापसाच्या तरंगत जाणाऱ्या म्हाताऱ्यांनी विलक्षण दिसे, अद्‌भूत वाटे. म्हातारी हाताला गुलगुलीत, रेशमी लागायची. पण त्या एकंदर गूढ अद्‌भुताने स्पर्श करू नये असं वाटत राही.

एरवी हिरवाकंच झाडोरा. सावरीचा काटा नि घाणेरीचं पान एकत्र चावून खाल्लं की पान खाल्ल्यासारखं तोंड रंगे, गुराखी पोरं तोंड रंगवायला मुद्दाम यायची. ढोरं बाद्याच्या वढ्यानं चरायची. पोरं इथं तोंडभर रंगायची. गमतीला यायची. या नादात ढोरं कुठंच्या कुठं जायची. मग घरात गालफाडं रंगायची. सावरीचा काटा कानशिलात रूतायचा. तरीही ओढ त्याचीच. रंगीत काट्याची.

बीन आवातण्याचं पंगतीत येऊन घुसावं, तसं डोल्या उंबराचं. दोन सावरीच्या मध्येच बेचक्यात आपले पाय रूतवलेले. सावरींनी काटे फिसकारले तरी त्यांना न जुमानता फांद्या पसरीत राहिलेला. सावरींनी जास्त काटे रूतवायची सुरुवात केली. हा डगमगला नाही. त्यानं नेल्र्यांच्या वडावरची, बिळाशीच्या पिंपरावरची आग्या

मव्हं पैऱ्यानं बोलावली. त्यांची कुमक आली. तशा सावरी जरा सावरल्या. पडती फळी घेतल्यागत केलं. डुल्या अधिकच डुलू लागला. मव्हाची पोळीच्या पोळी लोंबू लागली. एक एक पोळं ह्येच्या ह्ये. खापच्या खाप. अवती-भवतीच्या झाडांच्या छात्या दडपून गेल्या. डुल्या हुंबर म्हणजे आग्या मव्हाची वस्तीच झाली. हिरवागार डुल्या काळाभोर दिसू लागला. इतरांना भीती दाखवू लागला. दमदाटी करू लागला. सावरीही बेरकी. ज्या गावचा हुंबूर त्याच गावच्या त्याही होत्या. त्यांनी आग्या मव्हाच्या काही माश्यांना वश केलं. तांबड्या फुलांची लालूच दाखवली. बघता बघता इकडे तिकडे वस्ती वाढलेली डुल्याला कळलेही नाही. डावी-उजवीकडं शत्रूंनी ठाणी उभारलेली, निशाणं रोखलेली. लालेलाल झाला. पिकल्या गोड हुंबराच्या आशेनं जाणारी पोरं बिचकत जायची. माणसं जवळ फिरकेनाशी झाली. न जाणो काही झालं तर? तसंच घडलं. डुल्याच्या डोणीतील पोपटांची पिली सापानं चापलली. पोपटांचा थवाच्या थवा पट्टेवाल्या सापावर तुटून पडला. साप सैरभैर झाला. वरच्या फांदीवरनं निसटला. सरळ खालच्या फांदीच्या लटकत्या मव्हावर पडला. बघता बघता मव्हाण उठलं. संतापलं... दिसेल त्याला कडकडून चावलं. बाजार वाटंनं जाणाऱ्या माणसांच्या पाठी लागलं. फोडून काढलं... त्याच्या अंगात काटेच काटे रूतले. जो तो सुजला. फुगला. लोद झाला. सारा शिवार पाण्यात जाऊन पडला. माश्यांचा काळाकोट थवा इवाँ... ई... करीत शिवारभर नाचत होता. त्याची सावली पडताना दिसे. केव्हा केव्हा ही सावली गावावरनं सरपटताना दिसे.

गावानं डुल्याचा धसका घेतला. अजूनही घुमाणमिट्यासारखा डुल्या ही आग सांभाळून आहे. असं असलं तरी डुल्याची पिकलेली उंबरं म्हणजे मधान. मधच भरलेला. पोरंटोरं लोंबणाऱ्या लटांबराकडं दबकत पाहात. हुंबरांसाठी डुल्यावर माया करीत. खारी-पोपटांनी उष्टी केलेली उंबरं अधिकच चवदार लागत. त्यांची चव घेत. आळीत शिकणारं पोरगं डुल्याच्या खोडावर आपलं नाव दगडानं गिचमडी... नेत्याचा तुक्या. बारा बैत्यांचा नि शहाण्णव कुळींचा उद्धार या डुल्यावर झालेला असायचा.

एकटंदुकटं माणूस उन्हातान्हाचं बाद्याकडं फिरकत नसे. बाद्यात गवती रान. सड्याफड्याचं. त्यात जागोजागी असलेली मोठ्ठाली वारूळं. तणकटलेल्या ढेपणी. त्यावर वाऱ्यानं हलणारी कातीच्या पताका. किंवा उन्हात चमकणारी ताजी ताजी कात. त्याच्या अवतीभवतीचं सापाचं पडलेलं लोडमंच्या लोडमं, इथल्या फुरशानं



टचकन् उडी मारून कुणासचं नाक धरलं होतं म्हणे. कधी तिरपीला तिडबिडत असलेली जुळी. खुरट्या झुडपांनाच वेढा टाकून पडलेल्या धामणी. कशानं मरून पडलेल्या भल्यामोठ्या धुडावर मुंग्यांचं फुटलेलं पेव. कुठं बाभळंटावर चढलेल्या सापाभोवती कलकलत उठलेल्या भोरड्या. कुठेतरी वर पाय करून मरून पडलेले (चोची वासलेले) पाखरू दिसायचं. वाळून पाचोळा झालेल्या पाखरांची पिसं उस्कटत असलेली दिसायची. झुडपातल्या घरट्यातली अंडी फुटलेली आढळायची. सापाची नुळनुळीत लांबसर पिल्लं सळसळत जायची. ठिसकारायची. फणा काढायची. एवढीशीच पण त्यांची वेगवान मुरड धडकी भरवणारी. हे सारं नुसतं आठवलं तरी काळजाचे ठोके चुकता चुकता वाचणारे.

इथल्या बाभळी बाद्याला बेरूप करून टाकायच्या. काही बाभळी तर जुनाट. अनेक पावसाळ्यांचं पाणी आटून वठलेल्या. उगाच आपल्या वाळक्या हातांनी आकाश आवरून धरीत असल्यासारखा आव आणणाऱ्या. भर दुपारी भुतासारख्या भेसूर वाटणाऱ्या. चांदण्या रात्री पिशाच्चासारख्या उग्र दिसणाऱ्या. पुसट अंधारात तर उभ्या अस्वलासारख्या अंगावर चालून येत असलेल्या. एका बाभळीवर तर उंच केलक्यात बांडगूळ. हिरवंगार. सारी बाभळ वाळलेल्या कावळकाटक्यांची आणि तिथंच हिरवंगार बांडगूळ.... कसंसंच वाटणारं. या शापित बाभळी जीव गुदमरून टाकतात. काही बाभळी तर काटेरल्या फांजरीच्या, तर काही... उंच उंटासारख्या... जिराफासारख्या... काही गाठाळलेल्या... करटं व्हावीत तशा. गाठाळलेल्या भागातून वंगणासारखा काळा घट्ट रस झिरपत ठेवणाऱ्या. सडलेल्या जखमेतून रक्त्यापू वाहावा तशा. गंडमाळा झाल्यागत कुरूप... अगदी कुरूप. साताजन्मांच्या पापांचा भोग भोगणाऱ्या-पायीच्या रोपट्यांना किरटं खुरटं करणाऱ्या... पण त्यांच्यावरल्या काचेरी डिंकासाठी पोटाची साल्टी सोलून घेणाऱ्या पोरांची धाव वाण्याच्या दुकानापर्यंत. काळ्या पाटीवर धुळाक्षरे गिरवली जात ती 'ड... ड डिंकातला ड.' शाळा सुटताना परवचा म्हटली जाई ती 'बाभळ एके बाभळ. बाभळ दुणे बाभळ...'

एक बाभळ तर तरणीताठी. तजेलदार हिरव्या गार पानांची, मधुर पिवळ्या फुलांची. स्वप्नात तरंगणारी. कातीव अंगकाठीची. सिंहकटी पल्लेदार पट्याच्या पात्यासारखी. पण तिच्यावरच सुतार पक्ष्यांची ठोक ठोक चाललेली... जणू तिच्या ठसठसणाऱ्या तारुण्यावरचा तो असह्य उतारा वाटावा ! भरल्या उन्हातान्हातल्या जवानीतल्या पोरीला डागावी तसंच हे. तटतटणाऱ्या उन्मादातला श्वास न् श्वास

कोंडून घुसमटून टाकल्यासारखा. कुठल्या तरी काळ्या नजरेची तिच्यावर रोखलेली सावली पडावी तसं वाटावं.

तिच्याखालूनच एक पुसट चोरटी पायवाट जाते. तिथून मोठ्या ढोलीच्या चिकाळू आंब्याखाली जाऊन ती दिसेनाशी होते. भुरटे चोर नी दांडगीसर दरोडेखोर रात्री इथे जमतात म्हणे. मसलत ठरते. आखणी होते. गावातल्या कुठल्या घरावर कसं जायचं ते चिकाळू आंब्याखाली शिजतं. गावाचा हा वैरीच. दरोडेखोर गावात घुसले की, त्यांची कापडं सांभाळीत चिकाळू आंबा बसतो. मग हा गावाचा कुण्या जल्माचा वाद्या म्हणू नये तर काय?

घर फुटलेलं सकाळचं दिसलं की, सगळ्या गावाचं कारवान पळत सुटायचं ते बाद्यात. तिथं उस्कटलेल्या पेटऱ्या पडलेल्या असायच्या. हवं ते घेऊन चोरांनी बाकीचं विस्कटून टाकलेलं असायचं... कागदपत्रं... जुनं पुराणं... दागिन्याचं मोकळं डबं... लग्नातलं जुनं शालू... सुरकुतलेले कोट. माणसं आरडाओरडायची. तोंडावर मारून साठविलेला पैपैसा, दागदागिना लुटलेला असायचा. आयाबाया तर तोंडात माती कोंबून रडायच्या. हात घासून चोरांना शाप द्यायच्या. चिकाळू-चोरांना वश असलेला चिकाळू गप्प गप्प असायचा... म्हणूनच साऱ्यांच्या जीवाचा तळतळाट त्याला लागलेला असावा. त्याच्या पानापानावर मुरमं फुटल्यागत फुटलेली. त्यातून चिकाचे तुषार हवेत झिरपत असायचे. माणसाच्या अंगावर त्या चिकाचे तुषार पडले की, अंगावर चीक उठायचा. खाज सुटायची. चिकाळू आंब्याची फळंही चिकाळू. पिकलाच तर त्यात नरकातल्या किडद्यासारखे किडे रौरवत, वळवळत असायचे. चीक मुरमुरत असायचा. चिकाळूच्या ढोलीतच घुबडं राहिलेली. रात्रीची माणसासारखी कण्हायची... रडायची. अंधारी रात्र गडद-गडद व्हायची. डोळ्यात वडस वाढल्यासारखा चिकाळू चाचपडत उभा असलेला दिसायचा. धृतराष्ट्रासारखा.

या चिकाळूला सतत खिजवत असायचे ते इथले वानरांचे कळप. त्याच्या फांद्या, फांद्या गदागदा हालवायचे. काळ्या तोंडाच्या वानरांना त्याची पर्वा नव्हती. त्याच्या फांद्या मोडत नि खाली फेकत. जिथं तिथं डिवचून आंधळ्याची फटफजिती करावी तशी चिकाळूची टर उडविली जायची. साऱ्या वारणापट्ट्यातल्या वानरांची बादं म्हणजे वस्ती होती. तळ ठोकून असत कायमचा. उजाडलं की वारणेच्या किनाऱ्यानं पांगत. अंधार पडू लागायच्या आधी चहू अंगानं वानरांचं कळप परतू लागत. जत्रसनं आल्यासारखी. उड्या मारीत विसाव्याला येत, कचवचत... भांडत.



एकमेकांवर खिसकत. झोंबाझोंबी होई. 'हुऽऽप...' करून वारणाखोरा दणाणून सोडत. त्या कळपांचा म्होरक्या मोठ्या ताकदीचा. समंजस. त्याचा दबदबा सर्वांवर. एकदा कळपातला उनाड वानर वाटेनं जाणाऱ्या माळवं विकणाऱ्या बाईच्या आडवा उभा राहिला. ह्यानं तर वाट अडवलेली. पुरुषासारखी. बाईची पाचावर धारण बसलेली. हा हलेना की खिलेना. बाईवर नजर लावून उभा... बाद्याचा वंशजच तो. माळवंवालीनं पाटीतलं कलिंगड त्याच्यापुढं टाकलं... पण त्याची नजर पुरुषासारखी न ढळलेली. तो पुढं सरकू लागला तसा माळवंवालीला घाम फुटला. एवढ्यात झाडावरच्या म्होरक्याची नजर रस्त्याकडं गेली. तो मोठ्यानं खिसकला. झाडावरून झेपावत आला. त्या वानराच्या अंगावर झेप घेऊन त्याला लोळवला. ओरबडला. रक्तबंबाळ केला. कळपातून हाकलून लावला की मारला त्याचा नंतर मागमूस लागला नाही. त्या उपल्याची-म्होरक्याची गोष्ट माळवंवालीनं माळव्याबरोबर चौमुलखात फुकट वाटून टाकलेली. पण तरीही बाद्याबद्दलची कटुता कडवटच होत राहिलेली.

बाद्याच्या कडेकडेनं भीत भीत जाणाऱ्या ओढ्याकाठी काटं कोळशिंद्यांचं प्याव फुटलेलं. काळ्या धोतऱ्याची राठ काळपट हिरवी पानं... त्यांचं काळभोर बी खाल्लं की गुंगी येई. पोरांचे चाळे चालत, थोरांचेही पोरखेळ होत. माकडं बनायला वेळ लागत नसे. सराटे, निगड्या गळ्यात गळे घालून फुगड्या घालणाऱ्या. निगडी आणि निगूड यातला फरकच न कळणारा. खराट्यासाठी निगडीच्या ढाळ्या न्याव्या तर निगूड निघायचा. माणसं निगुडाचा खराटा उकिरड्यावर फेकत म्हणायची... 'बाद्यातला निगूड नी घरादाराचा इजूगुड.' विस्कोटच घराचा. बाद्यातली प्रत्येक गोष्ट ही अशी.

माझ्या मनात तर बाद्याबद्दल कायमची अढी बसलेली. बाद्यात डुल्या हुंबरासारखी आणखी दोन-तीन हुंबराची झाडं. एकावर तेलमुंगळ्यांचा जागता पहारा. सारखी मुळ्यापासून शेंड्यापर्यंत त्यांची गस्त चालू. चावल्यावर चकांदच्या चकांदं अंगावर उठायचं. त्यावर फिरकण्याची छाती नसायची. दुसरा तर अंगभर दाट लव असलेला. चढायला गेलं की गुळगुळीत लवीवरनं पाय निसटायचे. पायाला घामाचे पाझर फुटायचे. हातही चिंब व्हायचे. तिसरा उंबरोजी तर जगावेगळा. त्याच्या पिकलेल्या उंबरात बारीक पाखरांचं कोठार भरलेलं. सगळा ओलावा गोठवून टाकल्यासारखा. मग खाणारं तोंडातलं सुटलेलं पाणी आवरत, त्या उंबराला